# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २७/२/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६०** **विषय क्रमांक- ५६०**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६० दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/३५/२०२४ दि.२३/२/२०२४ अन्वये, पवना धरणापासून से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्र निगडीपर्यंत थेट पाईपलाईन टाकणेच्या कामाअंतर्गत लवाद नेमणे बाबत. |
| **ठराव क्र. ५६० दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/१/कावि/३५/२०२४ दि.२३/२/२०२४ अन्वये, पवना धरणापासून से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्र निगडीपर्यंत थेट पाईपलाईन टाकणेचे काम संबंधित ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी इंन्दू (जेव्ही) यांच्यामार्फत १८०० मि.मी. व्यासाचे एम.एस. पाईप टाकण्याचे काम चालू असताना ऑगस्ट २०११ मध्ये बऊर येथे पवना प्रकल्प विरोधात दि. ०९/०८/२०११ रोजी झालेल्या गोळीबार दुर्घटनेपासून आजतागायत मा. महाराष्ट्र राज्य शासन यांच्या आदेशान्वये बंद आहे. जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती आबाधीत ठेवणेसाठी मा. जिल्हा दंडाधिकारी पुणे यांनी दि. १०/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये पवना थेट पाईपलाईनचे काम तुर्त थांबविणेचे आदेश दिलेले आहेत<br><br>पवना थेट पाईपलाईनचे काम पुनश्चः चालु करणेकामी पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे मा. महाराष्ट्र शासन यांचेकडे वारंवार पाठपुरावा चालु आहे. त्याअनुषंगाने मा. महाराष्ट्र शासन दि. ०८/०९/२०२३ च्या पत्रान्वये पवना धरणापासून से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्र निगडीपर्यंत थेट पाईपलाईन टाकणेची योजना राबविणे संदर्भात पुर्वी देणेत आलेले “ जैसे थे ” आदेश सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने मागे घेण्यात येत असलेबाबत कळविले आहे.<br>पवना थेट पाईपलाईनचे संबंधित ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी इंन्दू (जेव्ही) यांनी केलेल्या Claims बाबत लवाद नेमणेकामी मा. महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे मनपामार्फत पाठपुरावा चालु होता. त्याअनुषंगाने कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी दि. १२/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पवना प्रकल्पातील ठेकेदाराच्या Claim बाबत निर्णय घेणेसाठी त्रयस्थ (Third Party Arbitrator) लवाद नेमणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने दि. ०२/०६/२०२३ रोजी मा. आयुक्त कक्ष येथे झालेल्या बैठकीत मा. उच्च |

| | |
|---|---|
| | न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांची लवाद (Arbitrator) म्हणून नेमणूक करणेचे ठरले आहे. सदर बैठकीत (Arbitrator) म्हणून मा. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांची नेमणूक करणेबाबत मा. आयुक्त व संबंधित कामाचे ठेकेदार यांनीसुद्धा सहमती दर्शविली आहे. सदर दि. ०२/०६/२०२३ रोजीच्या सभावृत्तांतानुसार मा. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांची (Arbitrator) म्हणून नेमणूक करणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>परंतू मा. आयुक्त यांचेकडील दि. ०६/१०/२०२३ रोजीच्या प्रस्तावात मा. आयुक्त यांनी ठेकेदाराकडून लेखी सहमती पत्र घेणेबाबत व निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांना विचारणा करणेबाबत शेराकंन केलेले आहे. त्याअनुषंगाने संबंधीत ठेकेदार मे. एनसीसी-एसएमसी इंन्दू (जेव्ही) यांनी त्यांचेकडील दि. १८/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांची (Arbitrator) म्हणून नेमणूक करणेस सहमती दर्शविलेली आहे. तसेच निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांना पत्र क्र. बक्षेका/पापू/टे.क्र.१/१५८/२०२३, दि. ०१/१२/२०२३ अन्वये पवना धरणापासून से.क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्र निगडीपर्यंत थेट पाईपलाईन टाकणेचे कामाअंतर्गत संबंदित ठेकेदाराने केलेल्या क्लेम्सबाबत निर्णय घेणेकामी लवाद (Sole Arbitrator) म्हणून नेमणेकामी सहमती कळविणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि. २१/१२/२०२३ रोजीच्या ई-मेल द्वारे सहमती कळविलेली आहे.<br>तरी पवना धरणापासून से. क्र. २३ जलशुद्धीकरण केंद्र निगडीपर्यंत थेट पाईपलाईन टाकणेच्या कामाअंतर्गत लवाद (Arbitrator) नेमणेकामी **(अ)** मा. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. संदिप के. शिंदे यांची लवाद (Sole Arbitrator) म्हणून नेमणूक करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६१** **विषय क्रमांक- ५६१**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६१ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/कावि/पापू/२०५५/२०२४ दि.२३/२/२०२४ अन्वये, ड प्रभागातील पाण्याच्या टाकीचे परिचालन करणेचे कामांस वाढीव प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५६१ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/कावि/पापू/२०५५/२०२४ दि.२३/२/२०२४ अन्वये, पाणीपुरवठा ग्रॅव्हिटी विभागाअंतर्गत **"सन २०२२-२३ करिता** |

**परिचालन करणेचे** तथापि, प्रथम मुदतवाढीचा कालावधी पुर्ण होणे अगोदर म्हणजे दि.२३/०८/२०२३ रोजी नविन एकत्रीत कामांसाठी निविदा प्रसिध्द करणे व अंदाजपत्रकातील कामाच्या नावात बदली व कामाची एकत्रीत निविदा काढणेस मान्यता मिळणेबाबत मंजूरी दिली आहे. मा. प्रशासक मा. महानगरपालिका ठराव क्र.४१२, दि.२३/०८/२०२३ अन्वये क्र.पापु/मुख्य/३/४७/२०२२-२०२३ नुसार प्रसिद्ध करणेत आलेली आहे. परिचालन व देखभाल दुरुस्तीची कामे एकत्रीत केल्याने सन २०२३-२४ चे परिचालन करणेसाठी मजुर पुरविणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामांचे आदेश देणेस विलंब होत आहे. तसेच सद्यस्थितीत खाली नमुद केलेल्या कामांची मुदत दि.१७/११/२०२३ रोजी संपुष्ठात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची प्रशासकीय मान्यता | आवश्यक सुधारित प्रशासकीय मान्यता | मुळ तांत्रिक मान्यता | आवश्यक सुधारित निविदा रक्कम | एकुण होणारा वाढीव खर्च | कामाचा कालावधी | सुधारित एकुण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ करिता पिंपळे गुरव टाकी व त्यावरील बायपास जलक्षेत्रातील वितरण व्यवस्थेचे परिचालन करणे मजुर पुरविणे. | ५०००००० | ८०००००० | ४५५८९४४ | ६५००००० | १९४१०५६ | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि.३१/०३/२०२४ पर्यंत | १६ महिने |
| | **आदेश क्र. :-** पापु/कावि/४१९/२० २२ दि.१८/११/२०२२ | | | | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या महसुली कामाचे परिचालन करणेकामी मजूर पुरविणे या कामाचे बिल अंतिम करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.१९/१२/२०२३ रोजी सुधारित एकूण कालावधी १६ महिने म्हणजेच दि.३१/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. सदर कामासाठी लागणारी तरतूद सन २०२४ - २५ च्या सुधारित अंदाजपत्रकात विभागामार्फत करण्यात येत आहे. तथापि, सदरचे काम महसूली व अत्यावश्यक सेवेमधील असल्याने सद्यस्थितीत सदरचे काम चालू ठेवावे लागत आहे. सबब, तक्त्यात नमूद केले प्रमाणे आवश्यक र.रू.८०,००,०००/- या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यतेस मा.प्रशासक मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त तक्त्यात नमूद केले नुसार र.रू.१९,४१,०५६/- एवढ्या होणाऱ्या वाढीव खर्चास मा.स्थायी समिती यांची मान्यता घेण्यात येत आहे. सदरचे काम संबंधित ठेकेदाराने चालू निविदा दराप्रमाणे वाढीव

| | |
|---|---|
| | कामे करण्यास तयारी दर्शविली आहे.<br><br>उपरोक्त कामास र.रू.८०,००,०००/- या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेकामीच्या विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६२** **विषय क्रमांक- ५६२**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६२ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/वि/कावि/९३/२०२४ दि.२१/२/२०२४ अन्वये, केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत च-होली येथे निवासी गाळे बांधणे प्रकल्पातील मूलभूत सुविधा पुरविणे कामांतर्गत विद्युत विषयक कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय सुधारीत मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५६२ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/वि/कावि/९३/२०२४ दि.२१/२/२०२४ अन्वये, केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मनपाच्या PMAY स्थापत्य विभागाकडुन च-होली येथे निवासी गाळे बांधणेचे काम चालु आहे. सदर ठिकाणी विद्युत विषयक काम करणेचे चालु असुन सदर कामाची निविदा क्र.४८/०१-२०२२/२३, निविदा रक्कम रू.४,२५,९९,३६८/- व निविदा दर १८.०७% कमी इतका आहे. या कामाचे आदेश एजन्सी मे.राधा इलेक्ट्रीकल यांना आदेश क्र.विमुका/५/कावि/ २४३/२०२३ दि.२९/०५/२०२३ अन्वये देण्यात आले आहेत. या कामाची मुदत दि.३१/१२/२०२३ पर्यत आहे. सदर कामास मा.महापालिका सभेने ठराव क्र.५५३ दि.०४/०६/२०२० अन्वये र.रू.४,२४,९९,३६८/- इतकी प्रशासकीय मान्यता मंजुर केली आहे.तसेच मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.१४३७ दि.२१/०३/२०२३ अन्वये सदरचे काम एजन्सीकडुन निविदा दर १८.०७ % कमी दराने करणेस मान्यता दिली आहे.<br><br>सदर प्रकल्पातील इमारतीला म.रा.वि.वि.कं.लि.चा विजपुरवठा पुरविणे, इमारती आवारात स्ट्रीटलाईटची व्यवस्था करणे, फायर फाईटिंग यंत्रणेची उभारणी करणे इ. कामाचा समावेश आहे. PMAY स्थापत्य विभागाकडुन एकुण ७ इमारतीपैकी इमारत क्र.१,५,६,७ ची उभारणी करणेत आली आहे. उर्वरीत इमारत क्र. २,३,४ चे उभारणीचे काम सुरू आहे. सदर इमारतीच्या आवारात स्ट्रीटलाईटची व्यवस्था , फायर फाईटिंग पाईपींग व म.रा.वि.वि.कं.लि.च्या विजपुरवठा केबल टाकणेत आली आहे. तसेच सदर कामांतर्गत वापरायच्या साहित्यांपैकी ट्रान्सफॉर्मर, पॅनल, रिंगमेन युनीट, एलटी केबल व इतर अनुषंगिक साहित्याचा पुरवठा एजन्सीने केलेला असून सदरचे साहित्य प्रत्यक्ष साइटवर |

| | |
|---|---|
| | बसविण्यात आले आहे. सदरचे साहित्यांची जोडणी करण्यासाठी केबल टाकणेचे काम चार इमारतींकरता पूर्ण करण्यात आले असुन उर्वरीत कामे एजन्सीमार्फत सुरू आहेत.<br>सदर प्रकल्पासाठी म.रा.वि.वि.कं.लि.च्या विजपुरवठासाठीचे साहित्यांची उभारणी करणेसाठी अंदाजपत्रक क्र. CE(Dist)/M-1/PS/PCMC Charholi/26004 दि.३०/०८/२०२३ अन्वये अंदाजपत्रक प्राप्त झाले आहे. म.रा.वि.वि.कं.लि.च्या नियमांनुसार LT Feeder Pillar 8 Way with ACB - 8 No.s, LT Feeder Pillar 6 Way with ACB-3 No.s,LT Feeder Pillar 4 Way-8 No.s, 22kV AB Switch 400A 2 No.s, LT 3.5x300 Sq.mm cable-2Km, LT 3.5x185 Sq.mm cable-2Km, LT 3.5x70 Sq.mm cable-1Km, 22 kV/0.433 kV 630 kVA Indoor DTC-1No.,22 kV 3X300 Sq.mm Cable-200m या नविन साहित्यांचा म.रा.वि.वि.कं.लि.च्या अंदाजपत्रकात समावेश आहे. परंतु सदर नविन साहित्यांचा मुळ कामाचे निविदामध्ये समावेश नसलेने तसेच सदचे साहित्याची उभारणी करणे हे विषयांकित काम पुर्ण करण्यासाठी करणे अती अत्यावश्यक व क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन सुधारीत र.रू.५,४४,७९,१२३/- (वाढीव र.रू.१,१८,७९,७५५/-) +GST इतका खर्च अपेक्षीत आहे.<br>उपरोक्त विषयांकित काम पूर्ण करण्यासाठी म.रा.वि.वि.कं.लि.च्या अंदाजपत्रकानुसार काम करणे अत्यावश्यक व क्रमप्राप्त असलेने सदर कामाचे सुधारीत र.रू.५,४५,०९,६७९/- (वाढीव र.रू. १,१८,७९,७५५/-) +GST चे सुधारीत अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६३** **विषय क्रमांक- ५६३**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६३ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/७/कावि/१४७/२०२४ दि.२६/२/२०२४ अन्वये, श्री.सोहन निकम यांची उप अभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उप अभियंता (पर्यावरण) या पदावर समावेशनाने वर्ग करणे बाबत. |
| **ठराव क्र. ५६३ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/७/कावि/१४७/२०२४ दि.२६/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर उपअभियंता (पर्यावरण) या अभिनामाचे २ पदे वेतनश्रेणी र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० मध्ये शासन मंजूर आहे.<br>महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीसीसी- |

| | |
|---|---|
| | २०२०/प्र.क्र.३६१/नवि-२२, दि.०१ फेब्रुवारी, २०२१ अन्वये उपअभियंता (पर्यावरण) पदाकरीता सुधारित सेवाप्रवेश नियम मंजूर करण्यात आलेले आहेत.<br>महापालिका आस्थापनेवरील श्री.निकम सोहन मधुकर हे उपअभियंता (स्थापत्य)पदावर दिनांक ०३/०६/२०२० पासून कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेच्या दृष्टीने पर्यावरण या विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेण्याकरीता श्री.निकम यांची निवड केलेली होती. त्यानुसार श्री.निकम सोहन यांनी एम.टेक (पर्यावरण) अर्हता धारण केलेली आहे. श्री.निकम सोहन यांनी पर्यावरण या विषयातील पदव्युत्तर शिक्षण हे महापालिकेच्या मान्यतेने तसेच अध्ययन रजा मंजूर करुन शैक्षणिक अर्हता धारण केलेली असल्याने त्यांची सेवा उपअभियंता (पर्यावरण) संवर्गामध्ये वर्ग करण्याकामी त्यांनी वेळोवेळी विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने निर्णय घेण्याकामी दिनांक १४/१०/२०२१ रोजीचे पदोन्नती समितीने श्री.निकम यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) पदावर वर्ग करण्याकामी शिफारस केलेली आहे.<br>मात्र उपरोक्त सुधारीत मंजूर सेवाप्रवेश नियमामध्ये सेवा वर्ग अथवा समावेशनाची तरतुद नसल्याने प्रकरणी श्री.निकम सोहन मधुकर यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) पदावर वर्ग करण्याकामी शासनास शिफारस केलेली आहे. प्रकरणी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांची मान्यता घेण्याकामी यांनी दि.३०/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये सेवा समावेशनाने वर्ग करण्याकामी मा.महापालिका ठरावाची मागणी केलेली आहे.<br>महापालिका आस्थापनेवर उपअभियंता (स्थापत्य)व उपअभियंता (पर्यावरण) या संवर्गातील पदे समश्रेणीतील असून दि.०१ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे मंजूर सेवाप्रवेश नियमामध्ये सेवा समावेशनाव्दारे वर्ग करण्याबाबत तरतुद नसल्याने दिनांक १४/१०/२०२१ रोजीच्या पदोन्नती समितीची शिफारस विचारात घेवून श्री.निकम सोहन मधुकर यांच्या पर्यावरण विषयातील कामकाजाचा अनुभव तसेच त्यांचे ज्ञानाचा उपयोग महापालिका पर्यावरण पुरक कामकाजाकरीता होण्याच्या दृष्टीने त्यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा उपअभियंता (पर्यावरण) या पदावर वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६४** **विषय क्रमांक- ५६४**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६४ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र हक्षेका/वि/कावि/५२/२०२४ दिनांकः १५/०१/२०२४ अन्वये, ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कासारवाडी उपविभागांतर्गत सन २०२२-२३ मध्ये होणा-या विविध स्पर्धांकरिता तात्पुरत्या स्वरुपातील ध्वनिक्षेपण व विद्युत व्यवस्था करणे या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकातील वाढीव प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५६४ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र हक्षेका/वि/कावि/ ५२ /२०२४ दिनांकः १५/०१/२०२४ अन्वये, मा. उपायुक्त, क्रिडा विभाग यांचे कडील आदेश क्र. क्रिडा / ०६ / कावि / १०२१ /२०२३, दि. २९/१२/२०२३अन्वये मराठी नाट्य संमेलनासाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत कळविले आहे. तसेच आदेश क्र. क्रिडा/०७/कावि/४७०/२०२३, दि.२९/१२/२०२३ अन्वये ह क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत महाराष्ट्र ऑलंपिक संघटनेशी संलग्न विविध क्रिडा स्पर्धा आयोजन दि.१२/०१/२०२४ ते १४/०१/२०२४ (३ दिवस) सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत आयोजित करणेत आलेले आहे.<br><br>ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कासारवाडी उपविभागांतर्गत सन २०२२-२३ मध्ये होणा-या विविधा स्पर्धांकरिता तात्पुरत्या स्वरुपातील ध्वनिक्षेपन व विद्युत व्यवस्था करणे या कामास आदेश क्र.हक्षेका/नि/कावि/१२७/२०२३ दि. २३/०३/२०२३ अन्वये मे. त्रिमुर्ती मंडप स्पीकर्स अँन्ड इलेक्ट्रीकल्स यांना देणेत आलेले आहेत. सदर कामास प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये १०,००,०००/- इतकी असून त्या कामास कालावधी ३६५ दिवस म्हणजेच दि.२२/०३/२०२४ अखेर पर्यंत आहे. सदर कामाची मर्यादा र.रु.९,९१,७४३/- इतकी असुन आज अखेर प्रथम देय र.रु. ८,८५,८३४/- इतका खर्च झालेला असुन उर्वरीत र.रु. १,०६,०००/- अदा करणे बाकी आहे. उर्वरीत रकमेचे कामे संबंधित ठेकेदाराने पुर्ण केलेले आहे.<br><br>सदर अनुषंगिक कामे करणे करिता सद्यस्थितीत विद्युत विभागाकडे ध्वनिक्षेपण व विद्युत व्यवस्था करणेचे कोणतेही चालु काम नाही. उपरोक्त कामामध्ये जुनी प्रशासकीय मान्यता रक्कम १०,००,०००/- इतकी असून त्यामध्ये वाढीव प्रशासकीय रक्कम १०,००,०००/-अशी एकूण २०,००,०००/- इतक्या प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६५** **विषय क्रमांक- ५६५**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६५**<br><br>**दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .पर्या/०८/कावि/ १५७ /२०२४ दिनांक. २३/० २ /२०२४ अन्वये, "मुळा नदीवर, कळस व खडकीच्या दरम्यान बांधलेल्या ब्रिटीश कालीन बंधाऱ्यावर आवश्यक क्षमतेचे गेटस बसविणे.(हद्दीबाहेरील काम )" |
| **ठराव क्र. ५६५**<br><br>**दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .पर्या/०८/कावि/ १५७ /२०२४ दिनांक. २३/० २ /२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून मूळा, पवना व इंद्रायणी नदी वाहतात. त्यापैकी मुळा नदी पिंपरी चिंचवड शहर व पुणे शहराच्या हद्दीवरून वाहते. मुळा नदीवर पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीनंतर एका काठावर मौजे कळस व दुस-या काठावर खडकीगाव आहे. सदर ठिकाणी इंग्रज काळातील बांधण्यात आलेला चेक डॅम असून, सदर बंधा-यावरून दारुगोळा कारखाना (Ammunition Factory) – खडकी ला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर पाण्याचा वापर मुख्यत: डिझास्टर मॅनेजमेंटसाठी (आगीच्या घटनेवर नियंत्रण आणण्यासाठी) व बागकामासाठी करण्यात येत आहे. सदर बंधा-याला दरवाजा नसल्याने वर्षानूवर्षे वाळू व गाळ साचून तेथील तळाची पातळी वाढलेली आहे. त्यामुळे पावसाळयात पूरपरिस्थितीत पाण्याचा फुगवटा होऊन बोपखेल, सांगवी, पिंपळे निलख व बाणेर - औंध च्या रहीवाशी क्षेत्रामध्ये पाणी जाते. त्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण होत आहे.तसेच, सदर गाळात वर्षानुवर्षे साठलेल्या Untreated Sewage मुळे सदर ठिकाणी Anaerobic / Septic Condition तयार झाल्यामुळे नदी किनारी घाण वास येत आहे.नदीच्या पाण्यातील Dissolved Oxygen ची पातळी अगदी कमी झाली आहे. तसेच नदीचे पाणी प्रवाही न राहील्याने मोठ्या प्रमाणात जलपर्णीची वाढ होऊन अनारोग्याची स्थिती निर्माण होत आहे. मुळा नदीमध्ये होणारे अनाधिकृत बांधकामे, नाला व नदी काठी होणा-या अनाधिकृत भरावामुळे पुर परिस्थिती निर्माण होत असल्याने मा. हरीत लवाद येथे श्रीमती. शैलेजा देशपांडे विरूध्द MPCB-९०/२०२१ खटला दाखल आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एक प्रतिवादी आहे. त्यामुळे विषयांकीत बंधा-यामधील साठलेली वाळू व गाळ काढणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात बंधा-यामध्ये गाळ किंवा वाळू साचू नये याकरीता उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर बंधा-याच्या मध्यभागी KT Weir पद्धतीचे ४ गेटस बसविल्यास पावसाळयामध्ये/ आवश्यतेनुसार सदरचे गेटस उघडून त्यामधून वाळू व गाळ वाहून जाईल व वाहणा-या पाण्याला कोणत्याही प्रकारचा अडथळा राहणार नाही तसेच वेळोवेळी , सदरचे गेटस उघडे केल्याने नदीचे पाणी प्रवाहित राहून पाण्याची गुणवत्ता चांगली राहणार आहे.यामुळे सदर भागात जलपर्णी वाढणार नाही आणि पावसाळयात नेहमीच्या तुलनेत नदीची पातळी दीड मीटरने कमी राहील. याबाबत दिनांक १४/०२/२०२४ रोजी दारुगोळा कारखाना (Ammunition Factory) खडकी, पाटबंधारे विभाग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका अधिकारी यांचा सदर बंधा-यावर पाहणी दौरा झाला. त्यावेळेस सदर बंधा-यावर चार दरवाजे बसविण्याबाबत सहमती झाली. |

| | |
|---|---|
| | त्याअनुषंगाने बंधाराजवळील गाळ व वाळू काढणे, ४ ठिकाणी बंधारा तोडून दरवाजे बसविणे व अनुषंगिक कामे करणे या कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास अंदाजे र.रू. २२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सध्यस्थितीत पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत, "पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत पवना नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी आवश्यक कामे करणे" या कामातून सदरचे काम करणे शक्य आहे. सदरचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेर असल्याने त्याला मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.<br>मा. आयुक्त यांनी "पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत पवना नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी आवश्यक कामे करणे" या कामातून विषयांकीत काम करण्यास व त्यास येणारा खर्च र.रू. २२,००,०००/- ला व तसेच सदरचे काम मनपा हद्दीबाहेरील असल्याने पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर काम करण्याच्या प्रस्तावास दि. २३/०२/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरचे काम " पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत पवना नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी आवश्यक कामे करणे" या कामातून विषयांकीत काम करण्यास व त्यास येणारा खर्च र.रू. २२,००,०००/- ला व तसेच सदरचे काम मनपा हद्दीबाहेरील असल्याने पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर काम करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ५६६** **विषय क्रमांक- ५६६**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६६ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र क्र.हक्षेका/कावि/पापु/८८/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये,पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेर (शेवाळेवाडी) आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करणेचे कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत.. |
| **ठराव क्र. ५६६ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र क्र.हक्षेका/कावि/पापु/ ८८ /२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेर (शेवाळेवाडी) आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करणेचे कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे निविदा क्र. ३/३८/२०२२-२३कामाबाबतचे आदेश क्र. पापु/६/कावि/५४२/२०२२, दि. १४/१२/२०२२ अन्वये मे. फ्रेंड्स वॉटर सप्लायर्स यांना देणेत आलेले आहेत. सदर कामाची मुदत एकूण १२ महिने असून दि. १३/१२/२०२३ पर्यंत मुदत आहे. तथापी |

दि.१९/१२/२०२२ रोजीच्या मंजुर प्रस्तावानुसार मा. आयुक्त यांनी जरी विषयांकीत कामाची मुदत दि. १४/१२/२०२२ रोजी दिलेली असली तरी सदर कामाकरिता अदा करावयाचे बील दि.२०/११/२०२२ पासून संबंधित ठेकेदार यांनी पुरवठा केलेल्या टँकरची ट्रीप विषयांकीत कामातूनच अदा करावयाचे असले बाबत मान्यता देणेत आलेली आहे.

मा. राष्ट्रीय हरित लवाद यांचे न्यायालय, पुणे येथे Application No. 37/2016 (WZ) शेवाळवाडी ग्रामपंचायत तर्फे सरपंच आणि इतर विरुद्ध पुणे महानगरपालिका व इतर या केसमध्ये मा. न्यायालय यांनी दि. २१ डिसेंबर २०१६ रोजी शेवाळवाडी ग्रामपंचायतील ग्रामस्थासाठी पिण्याचे पाणी देणेसाठी पुणे महानगरपालिकेने ३० पिण्याच्या पाण्याचे टँकर (प्रत्येकी १०,००० लिटर ) व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १० पाण्याचे टँकर पुढील आदेश होईपर्यंत देणेचे आदेश दिले आहेत. त्यानुसार रोज १० ट्रीप पाण्याचे टँकर चालू आहेत. सदरचे काम हे सप्टेंबर – २०२३ रोजी निविदा रक्कम पर्यंत खर्च झालेले आहे. तरी ऑक्टोबर – २०२३ ते मार्च – २०२४ पर्यंतचे बिल अदायगीसाठी खालील प्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन त्यानुसार आवश्यक सुधारित निविदा रकमेत वाढ करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची प्रशासकीय मान्यता | आवश्यक सुधारित प्रशासकीय मान्यता | मुळ तांत्रिक मान्यता | आवश्यक सुधारित निविदा रक्कम | एकूण होणारा वाढीव खर्च | कामाचा कालावधी | सुधारित एकुण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीबाहेर आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करणे (शेवाळेवाडी )** | ७०००००० | १०००००००० | ५८३२४१३ | ९०००००० | ३१६७५८७ | मुळ मुदत – १२ महिने<br>प्रथम मुदतवाढ - दि.३१/०३/२०२४ पर्यंत | १६ महिने |
| | **आदेश क्र. :-** पापु/कावि/५४२ /२० २२ दि.१४/१२/२०२२ | | | | | | | |

तसेच सन २०२३ – २४ च्या अंदाजपत्रकात विषयांकीत ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणेकामी निविदा प्रसिद्धीची कार्यवाही चालू असून सदर कार्यवाही पुर्ण होऊन कामाचे आदेश संबंधित ठेकेदारास अदा करणेकरिता काही कालावधी लागणार आहे. व त्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या महसुली कामाचे टँकर पुरवठा करणेकामी या कामाचे बिल अंतिम करणेकामी एकूण कालावधी १६ महिने म्हणजेच दि.३१/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर सदर कामासाठी लागणारी तरतूद सन २०२३ - २४ च्या सुधारित अंदाजपत्रकात विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करणेत येईल. तथापि, सदरचे काम महसूली व अत्यावश्यक सेवेमधील असल्याने व मा. राष्ट्रीय हरित लवाद

| | |
|---|---|
| | न्यायप्रविष्ट असल्याने सद्यस्थितीत सदरचे काम चालू ठेवावे लागत आहे. सबब, तक्त्यात नमूद केले प्रमाणे आवश्यक र.रू. १,००००,०००/- या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यतेस मा.प्रशासक मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त तक्त्यात नमूद केले नुसार र.रू.३१,६७,५८७/- एवढ्या होणाऱ्या वाढीव खर्चास मा.स्थायी समिती यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. सदरचे काम संबंधित ठेकेदाराने चालू निविदा दराप्रमाणे वाढीव कामे करण्यास तयारी दर्शविली आहे.<br><br>सबब, उपरोक्त कामास र.रू.१,००००,०००/- या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता घेणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ५६७** **विषय क्रमांक- ५६७**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६७**<br><br>**दिनांक -**<br>**२७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .क्रीडा/१/कावि/४०४/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्रेक्षागृह/नाटयगृहातील अनामत, भाडे व इतर भाडे / दर आकारणीस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५६७**<br><br>**दिनांक -**<br>**२७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .क्रीडा/१/कावि/४०४/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडील १) आचार्य अत्रे रंगमंदीर, संत तुकाराम नगर, २) अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी, ३) नटसम्राट निळु फुले रंगमंदीर, पिंपळे गुरव, ४) प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड व ५) ग. दि. माडगूळकर नाटयगृह, प्राधिकरण, आकुर्डी यांचे अनामत, भाडे व इतर भाडे / दर इत्यादीस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२०३१, दि.२५/०७/२०२३ व मा.महापालिका सभा ठराव क्र.३९३, दि.२५/०७/२०२३ अन्वये नवीन सुधारित भाडे दर आकारणीस मंजूरी देणेत आलेली आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रेक्षा/चिंचवड/०१/कावि/१८५/२०२३, दि.३१/०७/२०२३ नुसार नवीन सुधारित भाडे मुल्य आकारणी आदेश निर्गत करणेत आलेले होते.<br>तथापि महानगरपालिकेने निश्चित केलेले भाडे मुल्य अधिकचे असल्याने ते कमी करणेबाबत नाट्य संस्थांकडून मागणी झालेली असून या संदर्भात दि.०६/०१/२०२४ रोजीच्या १०० व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी नाट्य संस्थेने केल्या मागणीनुसार पुर्वी प्रमाणे नाट्य संस्थांना भाडे शुल्क आकारण्याचे र्निदेश मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत. त्यानुसार व्यावसायिक व हौशी नाट्य संस्था, प्री स्कूल, शाळा / महाविद्यालय, व इतर कोणतीही संस्था / व्यक्तीं यांचेकडून दि.१०/०१/२०२३ |

| | |
|---|---|
| | रोजीच्या पुर्वीचे दराप्रमाणे दि.०६/०१/२०२४ पासून भाडे मुल्य आकारणी करणेस आदेश क्र.क्रीडा/०१/कावि/३६४/२०२४, दि.०६/०१/२०२४ अन्वये आदेश देणेत आलेले आहेत.<br>तरी आदेश क्र. क्रीडा/०१/कावि/३६४/२०२४, दि.०६/०१/२०२४ प्रमाणे लागू केलेल्या भाडेदरास मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६८** **विषय क्रमांक- ५६८**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६८<br>दिनांक -<br>२७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .पर्या/११/कावि/ २९ /२०२४<br>दि. २७/०२/२०२४ अन्वये, इंद्रायणी नदीवर, चिंबळी-मोशी व आळंदी दरम्यान बांधलेल्या बंधाऱ्यावर आवश्यक क्षमतेचे गेटस बसविणेस मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ५६८<br>दिनांक -<br>२७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .पर्या/११/कावि/ २९ /२०२४ दिनांक. २७/०२ /२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून मूळा, पवना व इंद्रायणी नदी वाहतात. त्यापैकी इंद्रायणी नदी पिंपरी चिंचवड शहराच्या उत्तरेकडून वाहते. इंद्रायणी नदीच्या उत्तरेस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची [PMRDA] हद्द असून नदीच्या उत्तरेकडील काठ [PMRDA] च्या हद्दीत व दक्षिणेकडील काठ पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत येत आहे. इंद्रायणी नदीवर पिंपरी चिंचवड हद्दीलगत मोशी-चिंबळी येथे १, आळंदी येथे २ व चऱ्होली येथे १ असे एकुण ४ बंधारे पूर्वी बांधण्यात आलेले आहेत. सदर बंधाऱ्याचे पाणी पूर्वी शेतीसाठी तसेच आळंदी नगरपरिषद येथे पिण्यासाठी वापरण्यात येत होते. आळंदी येथील बंधा-याचे दगडी बांधकाम असल्याने त्यास कुठल्याही प्रकारचे गेट नाही, त्यामुळे सदर ठिकाणी कायमस्वरुपी पाणी साठून रहाते. तसेच पावसाळयामध्ये नदीस पुर आल्यानंतर पुराचे पाणी दीड ते दोन मीटरने वाढते. चिंबळी येथे असणा-या बंधा-याचे बांधकाम कॉम्पोझिट पध्दतीचे असून खालच्या बाजूस दगडी बांधकाम व वरील बाजूस गेट बसविणेत आले आहेत, त्यामुळे दोन्ही बंधाऱ्याच्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह नैसर्गिकरित्या प्रवाहित राहत नसल्याने त्या ठिकाणी साठलेल्या Untreated Sewage (Domestic & Industrial) मुळे सदर ठिकाणी Anaerobic Condition / Septic Condition निर्माण होत आहे, त्यामुळे वारंवार नदीस फेस येत आहे. तसेच चऱ्होली येथे असणा-या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे देखील गेट कायमस्वरुपी बंद असल्यामुळे पावसाळया व्यतिरिक्त बंधाऱ्यातून साठलेले पाणी पडल्यानंतर पाण्यावर फेस निर्माण होतो.<br>तसेच इंद्रायणी नदीच्या सुरुवातीस लोणावळा नगरपरिषद, तळेगांव दाभाडे नगरपरिषद, देहू नगरपंचायत, इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच १० हजार लोकसंख्येपेक्षा मोठी गावे आहेत त्यांचे देखील सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळत आहे त्यामुळे पिंपरी चिंचवड व आळंदी परिसरात नदी किनारी घाण वास येत आहे. नदीच्या |

| | |
|---|---|
| | पाण्यातील Dissolved Oxygen ची पातळी अगदी कमी झाली आहे. इंद्रायणी नदीमध्ये होणारे अनाधिकृत बांधकामे, नाला व नदी काठी होणा-या अनाधिकृत भरावामुळे पुर परिस्थिती निर्माण होत आहे, त्यामुळे विषयांकीत बंधा-यामधील साठलेली वाळू व गाळ काढणे अत्यंत आवश्यक असून भविष्यात बंधा-यामध्ये गाळ किंवा वाळू साचू नये याकरीता कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.<br>सदर चारही बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस KT Weir पद्धतीचे ४ गेटस बसविल्यास पावसाळयामध्ये/ आवश्यतेनुसार सदरचे गेटस उघडून त्यामधून वाळू व गाळ वाहून जाईल व वाहणा-या पाण्याला कोणत्याही प्रकारचा अडथळा राहणार नाही तसेच वेळोवेळी, सदरचे गेटस उघडे केल्याने नदीचे पाणी प्रवाहित राहून पाण्याची गुणवत्ता चांगली राहणार आहे.यामुळे सदर भागात जलपर्णी वाढणार नाही आणि पावसाळ्यात नेहमीच्या तुलनेत नदीची पातळी दीड मीटरने कमी राहील. याबाबत दिनांक २४/११/२०२३ रोजी पाटबंधारे विभागास सदर बंधाऱ्यांची आवश्यकता आहे किंवा नाही याची तपासणी करणे बाबत कळविणेत आले असून याबाबत त्यांचेकडून पत्रोत्तर मनपास प्राप्त झालेले नाही.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दिनांक २०/०२/२०२४ रोजी सदर बंधाऱ्यांची स्थळ पाहणी करणेत आली असून नदीचे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित राहणेकरिता नदीवर असणारे चारही छोटे बंधारे काढणे आवश्यक आहे. तसेच सदर बंधाऱ्याची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत आळंदी नगरपरिषद व पाटबंधारे विभागास विचारणा करणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकता नसल्यास सदरचे बंधारे काढावे व आवश्यकता असल्यास सदर बंधाऱ्यास खालच्या बाजूने गेट बसविणे क्रमप्राप्त आहे.<br>सध्यस्थितीत पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत, “पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत इंद्रायणी नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी आवश्यक कामे करणे (Interceptor Line)” या कामातून सदरचे काम करणे शक्य आहे. सदरचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीबाहेर असल्याने त्याला मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.<br>मा. आयुक्त यांनी “पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत इंद्रायणी नदीच्या प्रदुषण नियंत्रणासाठी आवश्यक कामे करणे (Interceptor Line)” या कामातून विषयांकीत काम करण्यास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास व सदरचे काम मनपा हद्दीबाहेरील असल्याने पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर काम करण्याच्या प्रस्तावास दि. २७/०२/२०२४ रोजी मान्यता दिलेली असल्याने पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर काम करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५६९** **विषय क्रमांक- ५६९**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५६९ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र जा.क्र. स्था/कावि/२५/१९/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रमा अंतर्गत मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्षेत्र विकास अंतर्गत प्राप्त नधीबाबत. |
| **ठराव क्र. ५६९ दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र जा.क्र. स्था/कावि/२५/१९/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन अल्पसंख्यांक समुदायाच्या एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासन निर्णय क्रमांक क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९,मंत्रालय,मुंबई-४०००३२. दि.१८/०६/२०१५ नुसार योजनेची कार्यपद्धती निश्चित करणेत आली आहे. त्यानुसार क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत विकास काम हाती घेण्यास संबंधित महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.<br>शासन निर्णयानुसार राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२३- २४ करिता पिंपरी चिंचवड मनपामधील खालील नमूद केलेल्या कामास निधी उपलब्ध झाला आहे. सदर कामांसाठी तांत्रिक मान्यता घेवून परिपुर्ण असे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. |

| अनु क्र. | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कामांची नावे | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | चिंचवड विधानसभा मतदार संघातील काळेवाडी येथील जमाते गुलशिने अंजुमन रजा मस्जिद पवनानगर परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगीक विकास कामे करणे. | २०लक्ष |
| २ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील काळेवाडी येथील पवना नगर कॉलनी नं. २, मच्छी मार्केट परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगीक विकास कामे करणे. | २० लक्ष |
| ३ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील किवळे येथील सेंट मेरीज चर्च सेरो मलाबार विकासनगर परिसरात अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे व तद्नुषंगीक विकास कामे करणे. | २५ लक्ष |
| ४ | चिंचवड विधानसभा मतदारसंघातील काळेवाडी मेन रोड पाचपीर चौक येथील जमाते सुभानिया मस्जिद, जमाते गुलशिने अंजुमन रजा मस्जिद पवनानगर, राजवाडेनगर जमाते जामा मस्जिद नढे नगर, रावेत मस्जिद, पिंपळे गुरव मस्जिद परिसरात इंधन विहिरी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे व तद्नुषंगीक विकास कामे करणे. | १० लक्ष |
| | एकुण रक्कम रु. (लक्ष) | ७५लक्ष |

| | |
|---|---|
| | तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्य क्षेत्रामधील उपरोक्त सर्व कामांस क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ५७०** **विषय क्रमांक- ५७०**
**दिनांक – २७/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७० दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सविवि/७/कावि/३११/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये, "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" या योजनेअंतर्गत वस्तीपातळीवर प्रशिक्षण योजना राबविणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५७० दिनांक - २७/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .सविवि/७/कावि/३११/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिला / मुलींना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा, त्यांचे ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी, विविध व्यवसाय कलांमध्ये महिलांनी पारंगत होऊन त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे, महिलांनी व्यवसाय करुन त्यांचे कौटुंबिक आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, या महिला सक्षमीकरणाच्या व सबलीकरणाच्या दृष्टीने / हेतुने महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रमांतर्गत विविध विषयांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत असते. त्यास अनुसरुन "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" या योजनेअंतर्गत वस्तीपातळीवर निविदा / रिक्वेस्ट फॉर प्रपोजल (RFP) द्वारे पात्र झालेल्या मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. या संस्थेची दि. ११/०१/२०२३ रोजीच्या अहवालानुसार निवड झालेली आहे.<br><br>निवड झाल्यानंतर दि. ३०/०१/२०२३ रोजीच्या संस्था नेमणुक आदेशान्वये व मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. या संस्थेला दिलेल्या वेळोवेळीच्या प्रशिक्षण आदेशानुसार संस्थेने वेगवेगळ्या विषयाचे प्रशिक्षण वस्तीपातळीवर प्रभावीपणे राबविले आहे. सदरचे प्रशिक्षण हे चांगल्या रितीने पार पडलेले असुन प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांची कुठल्याही प्रकारची तक्रार नाही.<br><br>तसेच संस्थेने मनपाशी केलेल्या करारनामान्वये, आदेशान्वये प्रशिक्षणाची |

अंमलबजावणी केली आहे. संस्थेला दिलेल्या सर्व जबाबदा-या अतिशय उत्तमरित्या पार पाडल्या आहेत व संस्थेने प्रशिक्षणाचे काम करारनाम्यात असलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करुन अतिशय उत्तमरित्या पुर्ण केले आहे.

सदरील संस्थेस संस्था नेमणुक आदेश एका वर्षासाठी दि. २९/०१/२०२४ या तारखेपर्यंत दिला होता व निविदा / रिक्वेस्ट फॉर प्रपोजल (RFP) मधील मुद्दा क्र. १.१.६ व करारनाम्यातील मुद्दा क्र. २९ प्रमाणे निवड झालेल्या संस्थेला प्रथमत: १ वर्ष कालावधीकरीता प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबतचा आदेश देण्यात येईल. व सदर १ वर्षाच्या कालावधीत संस्थेने विनातक्रार चांगल्याप्रकारे समाधानकारक प्रशिक्षण कार्यक्रम राबविल्यास संस्थेस पुढील २ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येईल असे नमुद आहे.

सद्यस्थितीत रिक्वेस्ट फॉर प्रपोजल (RFP) मध्ये व करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे कामाचा कालावधी व करारनाम्याचा कालावधी हा दि. २९/०१/२०२४ रोजी पुर्ण झाला आहे. परंतु संस्थेने दि. १२/०२/२०२४ रोजी पत्राद्वारे कळविले आहे की, सध्या संस्थेकडे लाभार्थ्यांचे विविध प्रशिक्षणासाठी अर्ज आलेले असुन पुढील वर्षभरात विविध प्रशिक्षणासाठी अजुन अर्ज येणे अपेक्षीत आहेत.

तसेच पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या विचारात घेता प्रत्येक वर्षी ३०००० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या कामाचा लाभ थेट शहरात असलेल्या वस्त्यांमधील लाभार्थ्यांपर्यंत जात असल्याने संपुर्ण शहरातील सर्व पक्षातील लोक प्रतिनिधींची लाभार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु रहावे म्हणुन प्रचंड प्रमाणात मागणी आहे.

केंद्रशासन व राज्य शासन महिला सक्षमीकरणासाठी व सबलीकरणासाठी NSDC मार्फत काही योजना राबवितात. परंतु त्या योजना एवढ्या प्रभावी नसतात आपण राबविलेली ही वस्तीपातळीवरची योजना अत्यंत प्रभावी ठरली आहे. ज्या महिला ५ वी, ७ वी, १० वी, १२ वी शिकलेल्या असतात त्यांना एवढ्या शिक्षणाच्या आधारावर काहीही काम करता येत नाही. आपल्या घरासाठी संसारासाठी आर्थिक दृष्ट्या हातभार लावता येत नाही. अशा घरी बसुन असलेल्या महिलांसाठी, निम्न मध्यमवर्गीय महिलांसाठी व मध्यमवर्गीय महिलांसाठी आपली ही प्रशिक्षणाची योजना अत्यंत प्रभावी ठरणार आहे. या प्रशिक्षणाने त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती होणार आहे व काही महिलांचा समुह एकत्र येऊन एखादा छोटा लघु उद्योग ही सुरु करु शकतो.

अशा वरील नमुद केलेल्या सर्व बाबी विचारात घेता महापालिका हद्दीतील कुठलीही गरजु महिला प्रशिक्षणापासुन वंचित राहु नये ही महापालिकेची सामाजिक बांधिलकी व जबाबदारी असल्याकारणाने व महापालिकेला बजेट च्या ५% खर्च महिला सक्षमीकरणासाठी व सबलीकरणासाठी व त्यांचे जिवनमान उंचावण्याकरीता होणे अनिवार्य असल्याकारणाने महानगरपालिका क्षेत्रातील गरजु महिला व मुलींकरीता हे कोर्सेस वस्तीपातळीवर

राबविण्यास मान्यता देणे आवश्यक आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकुण ३० कोर्सेस वस्तीपातळीवर राबविण्याचा आदेश संस्थेला देण्यात आला होता. या ३० पैकी १० कोर्सेसलाच महिलांचा प्रतिसाद मिळाला व १० कोर्सेस वस्तीपातळीवर राबविले गेले.म्हणुन पुढील आर्थिक वर्षात विभागाने संस्थेच्या वस्तीपातळीवर मोबीलायझेनसाठी असणा-या कर्मचा-यांबरोबर चर्चा केली असता शहरात कोर्सेस करण्यासाठी इच्छुक असणा-या महिलांची मागणी काही वेगळया कोर्सेससाठी आहे असे निदर्शनास आले म्हणुन विभागाने

३० कोर्सेस पैकी काही कोर्सेस कमी करुन ज्या कोर्सेसला वस्तीपातळीवरुन महिलांची मागणी आहे असे काही कोर्सेस समाविष्ट केले आहेत. म्हणजे ३० पैकी ज्या कोर्सेसला मागणी नाही ते कोर्सेस कमी केले व ज्या कोर्सेसला वस्तीपातळीवरुन महिलांची मागणी आहे असे काही कोर्सेस या प्रशिक्षण यादीत समाविष्ट केले आहेत. अशी एकुण २१ कोर्सेसला यापुढील आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२४-२५ साठी मान्यता देणे आवश्यक आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी निश्चित केलेली २१ प्रशिक्षण विषयांची यादी, दर व कालावधीसह

खालीलप्रमाणे “प्रपत्र – अ” –

| अ.क्र | विषयाचे नाव | प्रशिक्षण कार्यक्रम कालावधी (तास) | Cost Category | प्रति तास प्रति लाभार्थी प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्कावर १८% प्रमाणे होणारी जीएसटीची र.रु. | एकुण प्रशिक्षण शुल्क (प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीच्या रक्कमेसह होणारी रक्कम) र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| १ | फॅशन डिझायनर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| २ | असिस्टंट ब्युटी थेरीपिस्ट | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ३ | मेकअप ट्रेनर | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ४ | मेहंदी स्पेशालिस्ट | २०५ | २ | ४२ | ८६१० | १५५० | १०१६० |
| ५ | बालसंगोपण | २०० | २ | ४२ | ८४०० | १५१२ | ९९१२ |
| ६ | हेअर स्टायलिस्ट | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ७ | नेल टेक्नशियन | १८० | २ | ४२ | ७५६० | १३६१ | ८९२१ |
| ८ | योगा ट्रेनर | २२६ | २ | ४२ | ९४९२ | १७०९ | ११२०१ |
| ९ | केटरींग व बेकरी प्रोडक्टस | २७० | १ | ४९ | १३२३० | २३८१ | १५६११ |
| १० | मोत्यांचे दागिणे बनविणे | १८० | १ | ४९ | ८८२० | १५८८ | १०४०८ |
| ११ | स्पोकन इंग्लिश | २७० | ३ | ३५ | ९४५० | १७०१ | १११५१ |
| १२ | आरी वर्क व भरतकाम | २४० | १ | ४९ | ११७६० | २११७ | १३८७७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ज्युट बॅग व लेदर पर्स बनविणे | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| १४ | बोन्साय ट्री मेकींग व होम गार्डनिंग | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| १५ | कुशन कव्हर, डोअर मॅट, रजई तयार करणे | १५० | २ | ४२ | ६३०० | ११३४ | ७४३४ |
| १६ | म्युरल आर्ट, मंडला आर्ट, वारली पेंटींग | १८० | ३ | ३५ | ६३०० | ११३४ | ७४३४ |
| १७ | विविध मसाले, पापड, लोणची बनविणे | ९० | १ | ४९ | ४४१० | ७९४ | ५२०४ |
| १८ | फ्लोरिस्ट / फुलांच्या परड्या बनविणे (पुष्प सजावट) | २०० | ३ | ३५ | ७००० | १२६० | ८२६० |
| १९ | फळ प्रक्रिया (सॉस, जाम, जेली, केचअप इ.) | १८० | १ | ४९ | ८८२० | १५८८ | १०४०८ |
| २० | म्युचुअल फंड एजंट | २०० | ३ | ३५ | ७००० | १२६० | ८२६० |
| २१ | इंटेरिअर डिझायनर | २७० | २ | ४२ | ११३४० | २०४१ | १३३८१ |

महापालिकेने दिलेली जबाबदारी संस्थेने उत्तमरित्या पार पाडली आहे. वरील या सर्व बाबींचा विचार करता वरील नमुद सर्व बाबीं विचारात घेता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मान्यतेनुसारच व करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसारच संस्था नेमणुक आदेशाच्या दिनांका पासुन दि. ३१/०३/२०२५ अखेर पर्यंत होणा-या कामासाठी नविन करारनामा करुन महापालिकेच्या नियमाप्रमाणे स्टॅम्पड्युटी भरुन नविन करारनामा करणेस, वरील विविध २१ व्यावसायिक प्रशिक्षण व त्याकरिता असणारे दर व कालावधी, विविध व्यावसायिक प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रतिसादानुसार एका लाभार्थ्याला एक प्रशिक्षण या मर्यादेत व एका लाभार्थ्याने वरील पैकी ज्या प्रशिक्षणामध्ये भाग घेतला असेल तेच प्रशिक्षण तो लाभार्थी परत करु शकणार नाही या नियमासह संस्था नेमणुक आदेशाच्या दिनांका पासुन दि. ३१/०३/२०२५ अखेर पर्यंत मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांना मुदत वाढ देणे आवश्यक आहे. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल / दुरुस्ती करण्याचे व योजना अंमलबजावणी संबंधीत निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करुन योजना राबविण्यासंबंधीचे मागील वर्षीप्रमाणे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा. उप आयुक्त सो. (समाज विकास विभाग) यांना देणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

संस्था नेमणुक आदेशाच्या दिनांकापासुन दि. ३१/०३/२०२५ अखेरपर्यंत कालावधीत

| | |
|---|---|
| | झालेल्या प्रशिक्षणाची देयके ही सन २०२४/२५ या आर्थिक वर्षाच्या सदर योजनेसाठी होणा-या अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन म्हणजेच महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर उपलब्ध असणा-या / होणा-या तरतुदीतुन अदा करणेस मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच या योजनेसाठी सन २०२४-२०२५ या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करण्यात येणार आहे / केलेली आहे. त्यात "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम" या उपलेखाशिर्षावर असलेली तरतुद खर्च करण्यात यावी व "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम" या उपलेखाशिर्षासह इतर अन्य उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम" या उपलेखाशिर्षावर अन्य उपलेखाशिर्षांवरुन व समाज विकास विभागाकडील इतर (महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत केलेल्या तरतुदीं व्यतिरीक्त समाज विकास विभागासाठी केलेल्या इतर कल्याणकारी योजनेतील अन्य उपलेखाशिर्षांतील तरतुदी मधुन) उपलब्ध तरतुदींमधुन आवश्यकतेनुसार "महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम" या उपलेखाशिर्षावर रक्कमा वर्ग करणेस मान्यता देणे आवश्यक आहे. त्यानुसार "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" योजना ही मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचेमार्फत संस्था नेमणुक आदेशाच्या दिनांकापासुन दि. ३१/०३/२०२५ अखेरपर्यंतच्या कालावधीत प्रशिक्षण राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या वरील प्रमाणे धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**